# प्रकरण चौथे

## कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेची मांडवली रचना व कर्जपुरवठा (अल्प व मध्यम मुदत)

## प्रकरण चौथे

### कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेची भांडवली रचना व कर्जपुरवठा (अल्प व मध्यम मुदत)

### विभाग पहिला

#### कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेची भांडवली रचना

सहकारी संस्थेमध्ये भांडवल उभारणी या घटकास अनन्य साधारण महत्त्व आहे. कोणत्याही सहकारी संस्थेची प्रगती, यशस्विता व उद्दिष्ट पूर्ती भांडवलावर अवलंबून असते.

प्राथमिक सहकारी पतसंस्थांची भांडवली रचना सर्वसाधारणपणे स्वत:च्या मालकीचे निधी आणि बाहेरून भांडवल उभारणी या घटकांवर अवलंबून असते. याप्रमाणे कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या भांडवल उभारणी रचनेमध्ये पुढील दोन भाग आहेत.

१) संस्थेच्या मालकीचे निधी

२) संस्थेने उभारलेले निधी.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या मालकीच्या निधीमध्ये भाग भांडवल, राखीव निधी व इतर निधींचा समावेश आहे. संस्थेने उभारलेल्या निधीमध्ये संस्थेकडे असणाऱ्या ठेवी, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर शाखा श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर या बँकेकडून घेतलेली कर्जे व इतर कर्जे यांचा समावेश आहे. अशा दोन्ही भागातील निधीचे मिळून एकत्रित संस्थेचे खेळते भाग भांडवल तयार झाले आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

## तक्ता क्रमांक ४.१

## भांडवलाची रचना

| वर्ष | सभासदांचे भाग भांडवल रक्कम (रुपये) | सरकारी भाग भांडवल रक्कम | एकूण भाग भांडवल रक्कम (रुपये) | एकूण भाग भांडवलाचा वार्षिक वृध्दी दर |
|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | २,११,५०० | - | २,११,५०० | १०.९४ |
| १९८१-८२ | २,६४,६०० | - | २,६४,६०० | २०.५५ |
| १९८२-८३ | ३,०७,६७५ | - | ३,०७,६७५ | १६.२८ |
| १९८३-८४ | ३,४२,९०० | - | ३,४२,९०० | ११.४५ |
| १९८४-८५ | ३,७९,०७० | - | ३,७९,०७० | १०.५५ |
| १९८५-८६ | ४,११,६४० | - | ४,११,६४० | ८.५९ |
| १९८६-८७ | ४,३०,३८५ | - | ४,३०,३८५ | ४.५५ |
| १९८७-८८ | ४,५०,६१० | - | ४,५०,६१० | ४.७० |
| १९८८-८९ | ४,८३,३९० | - | ४,८३,३९० | ७.२७ |
| १९८९-९० | ५,१६,७०० | - | ५,१६,७०० | ६.८९ |
| १९९०-९१ | ५,५४,३६० | - | ५,५४,३६० | ७.२९ |


आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल.

आलेख क्र. ४.१

"संस्थेच्या १९८०-८१ ते १९९०-९१ या कालावधीत भाग भांडवलाच्या वार्षिक वृद्धिदर दर्शविणारा आलेख"

प्रमाण :-

१ सें.मी. = भाग भांडवलाच्या २% वार्षिक वृद्धिदर



१) संस्थेच्या मालकीचे निधी :

भाग भांडवल आणि संस्थेच्या विकासासाठी व अडचणीवर मात करण्यासाठी संस्थेने स्वत:च्या नफ्यातून निर्माण केलेला राखीव व इतर निधी यांचे एकत्रीकरणामधून संस्थेच्या मालकीचा निधी तयार होतो. हा निधी संस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा निधी आहे कारण हा निधी संपूर्णपणे संस्थेच्या मालकीचा असल्याने अशा भांडवलावर संस्थेला व्याज द्यावे लागत नाही. तसेच संस्थेच्या गरजेनुसार यातील भांडवल वापरता येते. त्यामुळेच याला संस्थेच्या मालकीचा निधी असे म्हटले आहे. कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेचे भाग भांडवल राखीव व इतर निधी पुढील प्रमाणे आहेत.

अ) भाग भांडवल -

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये जे भाग भांडवल जमा केलेले आहे ते सातत्याने वाढत आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर या बँकेतून मिळणारा कर्ज पुरवठा हा संस्थेच्या भाग भांडवलावर आधारित असल्याने पुढील काळातील सभासदांची कर्ज विषयक गरज पूर्ण करण्यासाठी भाग भांडवलात सतत वाढ करण्यात आली आहे. या संस्थेने कार्यक्षेत्रातील व्यक्तींना भागांची विक्री करून व ज्या वेळेस संस्था सभासदांना कर्ज देते त्यावेळेस प्रत्येक सभासदांकडून शेकडा ५.०० टक्के दराने भाग भांडवल जमा केलेले आहे. संस्थेने भागांची दर्शनी किंमत रु. ५-०० ठेवलेली आहे. संस्थेने एकूण भाग भांडवल सभासदांचे भाग भांडवल व सरकारी भाग भांडवल या दोन घटकांनी तयार होते.परंतु १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेने सरकारकडून भाग भांडवल घेतलेले नाही. तर सर्व भाग भांडवल हे संस्थेच्या सभासदांच्याच मालकीचे आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या भाग भांडवलाची रचना तक्ता क्र. ४.१ मध्ये दर्शविली आहे.

## तक्ता क्रमांक ४.२

### प्रतिसभासद भाग भांडवल


| वर्ष | सभासद संख्या | एकूण भाग भांडवल (रुपयात) | प्रति सभासद भाग भांडवल (रुपयात) | सभासद संख्येतील वार्षिक शेकडा वाढ | एकूण भाग भांडवलातील वार्षिक शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | ५५२ | २,१९,५०० | ३९,७६४-५० | १.२८ | १०.९४ |
| १९८१-८२ | ५६३ | २,६४,६०० | ४६,९९८-२२ | १.९९ | २०.५५ |
| १९८२-८३ | ५९६ | ३,०७,६७५ | ५१,६२३-३२ | ५.८६ | १६.२८ |
| १९८३-८४ | ६१४ | ३,४२,९०० | ५५,८४६-९० | ३.०२ | ११.४५ |
| १९८४-८५ | ६९४ | ३,७९,७७० | ५४,६२१-०४ | १३.०३ | १०.५५ |
| १९८५-८६ | ७०१ | ४,११,६४० | ५८,७२१-८२ | १.०० | ८.५९ |
| १९८६-८७ | ७१५ | ४,३०,३८५ | ६०,१९३-७१ | २.०० | ४.५५ |
| १९८७-८८ | ७१५ | ४,५०,६१० | ६३,०२२-३८ | ०.०० | ४.७० |
| १९८८-८९ | ७२४ | ४,८३,३९० | ६६,७६६-५७ | १.२६ | ७.२७ |
| १९८९-९० | ७२९ | ५,१६,७०० | ७०,८७७-९१ | ०.६९ | ६.८९ |
| १९९०-९१ | ७५९ | ५,५४,३६० | ७३,०३८-२१ | ४.१२ | ७.२९ |

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल.

## आलेख क्र. ४.२

"संस्थेच्या १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील सभासद संख्या व एकूण भाग भांडवल यांच्या वार्षिक शेकडा वाढीची तुलना दर्शविणारा आलेख"

प्रमाण :-
१ सें.मी. = 2% वार्षिक वाढ



१९८०-८१ मध्ये संस्थेच्या सभासदांच्या मालकीचे भाग भांडवल रु.२,१९,५०० होते. तर सरकारचे भाग भांडवल शुन्य आहे. म्हणजेच १९८०-८१ मध्ये संस्थेचे एकूण भाग भांडवल रु. २,१९,५०० आहे तर १९९०-९१ मध्ये संस्थेच्या सभासदांचे मालकीचे भाग भांडवल रु. ५,५४,३६० असुन सरकारच्या मालकीचे भाग भांडवल शुन्य आहे. म्हणजे संस्थेचे एकूण भाग भांडवल रु.५,५४,३६० आहे. (तक्ता क्र. ४.१) म्हणजेच संस्थेच्या १९८०-८१ च्या भाग भांडवलाशी १९९०-९१ मधील भाग भांडवलाची तुलना केल्यास १९९०-९१ च्या भाग भांडवल अडीच पटीने वाढलेले आहे (तक्ता क्र. ४.१).

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या एकूण भाग भांडवलाचा वार्षिक वृध्दी दर पाहिल्यास असे दिसते की, १९८१-८२ व १९८२-८३ या वर्षांमध्ये एकूण भाग भांडवलाचा वार्षिक वृध्दी दर जास्त आहे. म्हणजेच १९८१-८२ मध्ये एकूण भाग भांडवलाचा वार्षिक वृध्दी दर २०.५५ टक्के आहे. तर १९८२-८३ मध्ये वार्षिक वृध्दी दर १६.२८ टक्के आहे (तक्ता क्रमांक ४.१) कारण १९८१-८२ मध्ये व १९८२-८३ मध्ये संस्थेच्या सभासद संख्येमध्ये वाढ झालेली आहे. आणि संस्थेने दिलेल्या कर्जामध्येही वाढ झालेली आहे. म्हणजेच १९८१-८२ मध्ये सभासद संख्येत १.९९ टक्के व १९८२-८३ मध्ये ५.८६ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ४.२) आणि १९८१-८२ मध्ये कर्ज पुरवठयात २३.७३ टक्क्यांनी आणि १९८२-८३ मध्ये २५.७४ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. १९८३-८४ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेच्या एकूण भाग भांडवलातील वार्षिक वृध्दी दरामध्ये वाढ झालेली आहे. परंतु १९८१-८२ व १९८२-८३ या वर्षातील वार्षिक वृध्दी दरापेक्षा कमी आहे. उदा. १९८१-८२ मध्ये वार्षिक वृध्दी दर २०.५५ टक्के आहे तर १९८६-८७ मध्ये तो ४.५५ टक्के तर १९९०-९१ मध्ये ७.२९ टक्के आहे (तक्ता क्र. ४.२)

संस्थेच्या १९८०-८१ त १९९०-९१ या काळात संस्थेच्या सभासद संख्येत सातत्याने वाढ झालेली आहे (तक्ता क्र. ४.२) परंतु सभासद संख्येतील वार्षिक शेकडा वाढ कमी-जास्त आहे. उदा. १९८०-८१ मध्ये सभासद संख्येतील शेकडा वाढ १.२८ आहे. तर १९८२-८३ मधील शेकडा

वाढ ५.८६ टक्के आहे. तर १९८९-९० मधील शेकडा वाढ ०.६९ आहे. तर १९९०-९१ मधील शेकडा वाढ ४.१२ आहे. १९८४-८५ या वर्षामध्ये संस्थेच्या सभासद संख्येत सर्वात जास्त वाढ झालेली आहे (१३.३ टक्के) (तक्ता क्र. ४.२) कारण यावर्षी संस्थेमध्ये ८४ नवीन सभासद झालेले आहेत तर फक्त ४ सभासद कमी झालेले आहेत.

थोडक्यात १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील भाग भांडवला-बाबत पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील.

१) १९८०-८१ ते १९९०-९१ या काळात संस्थेच्या भाग भांडवलात सातत्याने वाढ झालेली आहे. परंतु काही वर्षी भाग भांडवलातील वाढ जास्त आहे तर काही वर्षी कमी आहे.

२) सभासद संख्येत व संस्थेने केलेल्या कर्ज पुरवठयात वाढ होत असल्यामुळे भाग भांडवल वाढण्यास मदत झाली आहे. कारण ज्यावेळी संस्था सभासदांना कर्ज पुरवठा करते त्यावेळी भाग भांडवल म्हणून शेकडा ५ टक्के रक्कम कपात करून घेते.

३) १९८५-८६ नंतर १९९०-९१ पर्यन्त भाग भांडवलातील वाढ कमी आहे.

४) १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेला सरकारी भाग भांडवलाची गरज भासली नाही. तसेच त्यामुळे येणारी सरकारी बंधने नकोत यासाठी संस्थेने सरकारी भाग भांडवल स्विकारले नाही.

ब) <u>राखीव आणि इतर निधी</u> -

कोणतीही सहकारी संस्था भविष्यकाळात येणाऱ्या अनपेक्षित संकटाना व धोक्यांना यशस्वी तोंड देता यावे म्हणून राखीव निधीची निर्मिती करते. सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार प्रत्येक सहकारी संस्थेने

## तक्ता क्र. ४.३

### निधीचे वर्गीकरण

(आकडे रुपयात)

| वर्ष | राखीव निधी | विशेष राखीव निधी | बुडीत कर्ज निधी | इमारत निधी | डॉज निधी | विशेष हमी निधी | धर्मादाय निधी | विशेष तातडीचा निधी | लाभांश सम्किरण निधी | अधिलाभांश सम्किरण निधी | तारणपत्र चढउतार निधी | लाभांश इक्विलायझेशन निधी | देणगी निधी | शिक्षण वैद्यकीय मदत | रिझर्व फंड | एकूण निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | ६५३८९ (६३.११) | २०७० (२.००) | १७५३ (१.६९) | १७२१६ (१६.६४) | १२७३ (१.२३) | ७६० (०.७३) | २८९७ (२.८०) | ९४० (०.९१) | १६११ (१.५६) | १६१८ (१.५६) | १३४३ (१.३०) | १५०० (१.४५) | ४१७२ (४.०३) | - (०.०) | ९३० (०.९१) | १०३४८० (१००.००) |
| १९८१-८२ | ७०२०९ (६३.४५) | २०७० (१.८७) | १७६१ (१.५९) | १७२६६ (१५.६०) | २३६७ (२.१४) | ७६० (०.६९) | ३१४३ (२.८४) | ९४० (०.८५) | १६११ (१.४६) | १६१८ (१.४६) | १४८६ (१.३४) | १५०० (१.३६) | ४१७२ (३.७७) | - (०.०) | १७५० (१.५८) | ११०६६२ (१००.००) |
| १९८२-८३ | ७९७३० (६३.७६) | २०७० (१.६६) | १९०४ (१.५२) | १७८३७ (१४.२६) | २७४६ (२.२०) | ७६० (०.६१) | ४८३९ (३.८७) | ९४० (०.७५) | २२९७ (१.८४) | २२९६ (१.८४) | १४८६ (१.१९) | १५०० (१.२०) | ४१७२ (३.३४) | ७१४ (०.५७) | १७५० (१.३९) | १२५०४१ (१००.[illegible]) |
| १९८३-८४ | ८७९२२ (६३.६६) | २०७० (१.५०) | १९३३ (१.४०) | १७९५३ (१३.००) | ३११५ (२.२६) | ७६० (०.५५) | ६०६४ (४.३९) | ९४० (०.६८) | २९०९ (२.११) | २९०८ (२.११) | १४८६ (१.०८) | १५०० (१.०९) | ४१७२ (३.०२) | ८६० (०.६२) | ३५३० (२.५३) | १३८१२२ (१००.[illegible]) |
| १९८४-८५ | ९८८१२ (६४.३०) | २०७० (१.३५) | २००३ (१.३०) | १८२३५ (११.८७) | ४२८३ (२.७९) | ७६० (०.४९) | ७४५६ (४.८५) | ९४० (०.६१) | ३६०६ (२.३५) | ३६०५ (२.३५) | १४८६ (०.९७) | १५०० (०.९८) | ४१७२ (२.७१) | १२१२ (०.७९) | ३५३० (२.२९) | [illegible] (१००.[illegible]) |
| १९८५-८६ | ११३३८१ (६५.२५) | २०७० (१.११) | २००३ (१.१५) | १८२३५ (१०.४९) | ५४५१ (३.१४) | ७६० (०.४४) | ९६३९ (५.५५) | ९४० (०.५४) | ४६९७ (२.७०) | ४६९६ (२.७०) | १४८६ (०.८६) | १५०० (०.८६) | ४१७२ (२.४०) | १२१२ (०.७०) | ३५३० (२.०३) | १७३७[illegible] (१००.००) |
| १९८६-८७ | १२८१४५ (६७.५४) | २०७० (१.०९) | २००३ (१.०६) | १८२३५ (९.६१) | ६६४५ (३.५०) | ७६० (०.४०) | ९६३९ (५.०८) | ९४० (०.५०) | ४६९७ (२.४८) | ४६९६ (२.४८) | १४८६ (०.७८) | १५०० (०.७९) | ४१७२ (२.२०) | १२१२ (०.६४) | ३५३० (१.८५) | १८[illegible]७३० (१००.००) |
| १९८७-८८ | १४४६७५ (६९.७३) | २०७० (१.००) | २००३ (०.९७) | १८२३५ (८.७९) | ७८६३ (३.७९) | ७६० (०.३७) | ९६३९ (४.६५) | ९४० (०.४५) | ४६९७ (२.२६) | ४६९६ (२.२६) | १४८६ (०.७२) | १५०० (०.७२) | ४१७२ (२.०१) | १२१२ (०.५८) | ३५३० (१.७०) | २०७४[illegible] (१००.००) |
| १९८८-८९ | १५६१४६ (७०.६१) | २०७० (०.९३) | २००३ (०.९०) | १८२३५ (८.२०) | ९२०९ (४.१४) | ७६० (०.३४) | ९६३९ (४.३४) | ९४० (०.४२) | ५४८७ (२.४७) | ५०९१ (२.२९) | १४८६ (०.६७) | १५०० (०.६७) | ४१७२ (१.८७) | १२१२ (०.५५) | ३५३० (१.६०) | २२२२८० (१००.[illegible]) |
| १९८९-९० | १६८८२२ (७१.२३) | २०७० (०.८७) | २००३ (०.८५) | १८९९६ (८.०२) | ११२९२ (४.७६) | ७६० (०.३२) | ९६३९ (४.०७) | ९४० (०.४०) | ५४८७ (२.३२) | ५०९१ (२.१५) | १४८६ (०.६३) | १५०० (०.६३) | ४१७२ (१.७६) | १२१२ (०.५१) | ३५३० (१.४८) | २३[illegible] (१००.[illegible]) |
| १९९०-९१ | १८३३३६ (७२.१६) | २०७० (०.८१) | २००३ (०.७९) | १९४६४ (७.६६) | १३३७५ (५.२६) | ७६० (०.३१) | ९६३९ (३.७९) | ९४० (०.३७) | ५४८७ (२.१६) | ५.११ (२.००) | १४८६ (०.५८) | १५०० (०.५९) | ४१७२ (१.६४) | १२१२ (०.४८) | ३५३० (१.४०) | [illegible] (१००.[illegible]) |
| एकूण : | १२९७३६७ (६७.७४) | २२७७० (१.१९) | २१३७२ (१.१२) | १९९९०७ (१०.४४) | ६७६११ (३.५३) | ८३६० (०.४४) | ८२२३३ (४.२९) | १०३४० (०.५४) | ४२६०२ (२.२२) | ४१४०६ (२.१६) | १६२०३ (०.८५) | १६५०० (०.८५) | ४५८९२ (२.४०) | १००५८ (०.५३) | ३२६७० (१.७०) | १९१५२[illegible] (१००.००) |

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल.

(कंसातील आकडे एकूण निधीशी प्रत्येक निधीचे शेकडा प्रमाण दर्शवितात.)

राखीव निधी उभारणे बंधनकारक आहे. संस्थेला होणाऱ्या नफ्यातील २५ टक्के नफा राखीव निधीमध्ये जमा केला जातो. राखीव निधीशिवाय संस्थेच्या विकासासाठी किंवा इतर कार्यासाठी संस्था स्वतंत्र निधी उभारू शकतात. उदा. - इमारत निधी, विशेष बुडीत निधी, कर्ज निधी, डावेज निधी इत्यादी.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ काळामध्ये संस्थेने उभारलेल्या राखीव आणि इतर निधीचे वर्गीकरण आणि रचना तक्ता क्र. ४.३ वरून समजून येते. या संस्थेने होणाऱ्या नफ्यातील २५ टक्के नफा राखीव निधी मध्ये जमा करून राखीव निधी उभारला आहे. याशिवाय खालील इतर वेगवेगळे निधी उभारले आहेत :

१) विशेष राखीव निधी
२) बुडीत कर्ज निधी
३) इमारत निधी
४) डावेज निधी
५) विशेष हमी निधी
६) धर्मादाय निधी
७) विशेष तातडीचा निधी
८) लाभांश समिती निधी
९) अधिलाभांश समिती निधी
१०) देणगी निधी
११) तारण चढउतार निधी
१२) लाभांश इक्विलायझेशन निधी
१३) शिक्षण, वैद्यकीय मदत निधी
१४) रिस्क फंड

वरील निधी निर्माण करण्यापाठीमागील संस्थेचे उद्देश्य खालीलप्रमाणे :

१) भविष्य काळात संस्थेची विश्वास अर्हतता टिकून राहावी.
२) इमारत बांधणे इ. सारखी विकासात्मक कामे करता यावीत.
३) भविष्यकाळात निर्माण होणारे अनपेक्षित धोके व नुकसान यावर यशस्वी मात करता यावी.
४) सभासदांना लाभांश देता यावा.
५) गरीब व गरजूंना शैक्षणिक, वैद्यकीय मदत करता यावी.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील राखीव निधीची रक्कम तक्ता क्र. ४.३ मध्ये दर्शविली आहे. १९८०-८१ मध्ये संस्थेने रू. ६५,३८९ राखीव निधी उभारला आहे. तर १९९०-९१ मध्ये रू. १,८३,३३६ राखीव निधी उभारला आहे. म्हणजेच १९८०-८१ या वर्षातील राखीव निधीशी तुलना करता १९९०-९१ च्या राखीव निधीमध्ये तीन पटीने वाढ झालेली आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या ११ वर्षामध्ये संस्थेने रू. १२,९७,३६७ राखीव निधी उभारला आहे( एकूण निधीमध्ये राखीव निधीचे प्रमाण सर्वात जास्त आहे. (६७.७४ टक्के)(तक्ता क्र.४.३) दरवर्षी संस्थेने जो एकूण निधी उभारला आहे त्यामध्ये राखीव निधीचेच प्रमाण जास्त आहे. उदा. १९८०-८१ मध्ये संस्थेच्या एकूण निधीमध्ये राखीव निधीचे प्रमाण ६३.०९ टक्के आहे. तर १९९०-९१ मध्ये ७२.१६ टक्के आहे.(तक्ता क्र.४.३) कारण दरवर्षी संस्थेला जो नफा होईल त्यामधील २५ टक्के नफा हा राखीव निधीमध्ये जमा केला पाहिजे अशी सहकारी कायद्यामध्ये तरतूद असल्यामुळे संस्थेने दरवर्षी नफ्यातील २५ टक्के भाग राखीव निधीमध्ये जमा केलेला आहे. त्यामुळे राखीव निधीतील रक्कम

दरवर्षी सातत्याने वाढत गेलेली आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या वर्षांतील दरवर्षीच्या एकूण निधीमध्ये राखीव निधीचे प्रमाण ६३ टक्के ते ७२ टक्क्यांच्या दरम्यान आहे. म्हणजेच दरवर्षीच्या एकूण निधीमध्ये राखीव निधीचे शेकडा प्रमाण जवळजवळ थोडया-फार फरकाने सारखेच आहे. तसेच संस्थेने विशेष राखीव निधी निर्माण केलेला आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ संपूर्ण काळामध्ये संस्थेने रु. २२,७७० इतका विशेष राखीव निधी निर्माण केलेला आहे आणि एकूण निधीमध्ये विशेष राखीव निधीचे प्रमाण १.१९ टक्के आहे. म्हणजेच हे प्रमाण अल्प आहे (तक्ता क्र. ४.३). १९८०-८१ ते १९९०-९१ या ११ वर्षांमध्ये संस्थेने प्रत्येक वर्षी रु. २,०७० इतकाच विशेष राखीव निधी निर्माण केलेला आहे.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने बुडीत कर्ज निधी निर्माण केलेला आहे. संस्थेच्या उपविधी नुसार शिल्लक नफ्याच्या १० टक्के पर्यन्त बुडीत कर्ज निधी उभा करावा अशी तरतूद आहे. संस्था सभासदांना कर्ज पुरवठा करते. काही कारणामुळे सभासद अचानक मयत झाल्यामुळे किंवा अन्य कारणामुळे त्याच्या कडील कर्ज वसूल करता येत नाही. अशावेळी बुडीत कर्ज निधीतील रकमेचा वापर केला जातो. १९८०-८१ मध्ये संस्थेने रु. १,७५३ इतका बुडीत कर्ज निधी उभारला आहे. तर १९९०-९१ मध्ये बुडीत कर्ज निधी रु.२,००३ आहे. १९८०-८१ शी तुलना करता १९९०-९१ मध्ये बुडीत कर्ज निधीमध्ये वाढ झालेली आहे. १९८०-८१ पासून १९८४-८५ पर्यंत बुडीत कर्ज निधीमध्ये वाढ झालेली आहे. परंतु १९८५-८६ ते १९९०-९१ पर्यन्त बुडीत कर्ज निधीमध्ये वाढ झालेली नाही. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये एकूण निधी मधील बुडीत कर्ज निधीचे प्रमाण सातत्याने घटत गेलेले आहे.उदा. १९८०-८१ मध्ये एकूण निधीमध्ये बुडीत कर्ज निधीचे प्रमाण १.६९ आहे. तर १९८६-८७ मध्ये १.०९ टक्के आहे तर १९९०-९१ मध्ये हेच प्रमाण ०.७९ टक्के आहे (तक्ता क्र. ४.३).

संस्थेच्या उपविधीमध्ये राखीव निधी, लाभांश, व अधिलाभांश समीकरण निधी काढून शिल्लक राहिलेल्या नफ्यातील जास्तीत जास्त ४० टक्क्यांपर्यन्त इमारत निधी काढता येईल, अशी तरतूद केलेली आहे. संस्थेच्या मालकीच्या इमारती बांधणे, जुन्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी इमारत निधीतील रकमेचा वापर केला जातो. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेच्या एकूण निधीमध्ये असणारे बुडीत कर्ज निधीचे शेकडा प्रमाण सातत्याने वाढत गेलेले आहे. (तक्ता क्र. ४.३) संस्थेच्या उपविधि-तील तरतुदीनुसार संस्थेने इमारत निधी निर्माण केलेला आहे. कारण संस्थेच्या मालकीच्या मांडवली वस्तू अबाधित व सुरक्षित राहाव्यात यासाठी इमारत निधी निर्माण केला जातो. १९८०-८१ मध्ये संस्थेने रू. १,२७३ इमारत निधी निर्माण केलेला आहे. तर १९९०-९१ मध्ये रू. १३,३७५ इमारत निधी निर्माण केलेला आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या ११ वर्षात प्रत्येक वर्षी संस्थेच्या एकूण निधीमध्ये असणारे इमारत निधीचे शेकडा प्रमाणात वाढत गेलेले आहे. उदा. १९८०-८१ मध्ये संस्थेच्या एकूण निधीमध्ये इमारत निधीचे प्रमाण १.२३ टक्के आहे तर १९८७-८८ मध्ये ३.७९ टक्के आहे. १९९०-९१ मध्ये ५.२६ टक्के आहे (तक्ता क्र. ४.३) याशिवाय संस्थेने संस्थेच्या उपविधीतील तरतुदीनुसार विशेष हमी निधी व धर्मादाय निधी, तारण चढउतार निधी, निर्माण केलेला आहे. १९८०-८१ मध्ये विशेष हमी निधी रू.७६० होता व १९९०-९१ मध्ये रू. ७६० च आहे. याचा अर्थ १९८०-८१ ते १९९०-९१ पर्यन्त या निधीतील रकमेत वाढ झालेली नाही. १९८०-८१ ते १९८५-८६ पर्यन्त धर्मादाय निधीचे संस्थेच्या एकूण निधीतील शेकडा प्रमाण वाढलेले आहे. तर १९८६-८७ नंतर १९९०-९१ पर्यन्त ते शेकडा प्रमाण घटत गेलेले आहे (तक्ता क्र. ४.३). १९८५-८६ नंतर १९९०-९१ पर्यन्त या निधीतील रकमेमध्ये प्रतीवर्षी रक्कम टाकलेली नाही.

सभासदांना लाभांश वाटप करण्यासाठी व नोकरांना अधिलाभांश देता यावा यासाठी संस्थेच्या उपविधीमध्ये प्रत्येकी शिल्लक नफ्यातील २ टक्के रक्कम लाभांश समिकरण निधी व अधिलाभांश समिकरण निधीमध्ये जमा करावी अशी संस्थेच्या उपविधीत तरतूद आहे. समजा काही कारणामुळे

संस्थेला तोटा झाल्यानंतर सभासदांना लाभांश व नोकरांना अधिलाभांश देण्यासाठी या निधीतील रकमेचा वापर करता येतो.

१९८०-८१ मध्ये संस्थेने रू. १,६१९ लाभांश समिकरण निधी निर्माण केला आहे. तर १९९०-९१ मध्ये रू. ५,४८७ लाभांश समिकरण निधी निर्माण केलेला आहे. १९८०-८१ मधील लाभांश समिकरण निधीशी तुलना करता १९९०-९१ मध्ये २३८.९१ टक्के नी वाढ झालेली आहे. म्हणजेच तीन पटीने वाढ झालेली आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेच्या एकूण निधीतील लाभांश समीकरण निधीच्या शेकडा प्रमाणात चढउतार आहे. म्हणजेच काही वर्षी एकूण निधीतील लाभांश समीकरण निधीचे प्रमाण वाढलेले आहे. तर काही वर्षी कमी झालेले आहे (तक्ता क्र. ४.३). त्याचप्रमाणे १९८०-८१ मध्ये संस्थेचा अधिलाभांश समीकरण निधी रू. १,६१८ आहे तर १९९०-९१ मध्ये रू. ५,०९१ आहे. म्हणजेच १९८०-८१ मधील अधिलाभांश समीकरण निधीशी १९९०-९१ मधील अधिलाभांश समिकरण निधीची तुलना केल्यास तीन पटीने वाढ झालेली आहे. एकूण निधीमध्ये अधिलाभांश समिकरण निधीचे शेकडा प्रमाण कमी आहे. कारण १९८०-८१ मध्ये एकूण निधीमध्ये समिकरण निधीचे प्रमाण १.५६ टक्के आहे तर १९९०-९१ मध्ये हेच प्रमाण २ टक्के आहे (तक्ता क्र.४.३). १९८०-८१ ते १९९०-९१ या ११ वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी संस्थेच्या एकूण निधीशी असलेल्या अधिलाभांश समिकरण निधीच्या शेकडा प्रमाणात चढउतार झालेला आहे (तक्ता क्र. ४.३).

संस्थेच्या उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेने संस्थेच्या सदस्यांचे शिक्षण, त्यांची सुसंस्कृतता वृध्दीगत करण्यासाठी, गरीबांना शैक्षणिक मदत करता यावी, त्यांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देता याव्यात व इतर सार्वजनिक स्वरूपाची कामे करण्यासाठी शिक्षण व वैद्यकीय निधी निर्माण केलेला आहे. शिक्षण वैद्यकीय निधीचे एकूण निधीमधील शेकडा प्रमाण फारच कमी आहे. १९८४-८५ पासून १९९०-९१ पर्यन्त एकूण

निधीतील शिक्षण व वैद्यकीय निधीचे शेकडा प्रमाण घटत गेलेले आहे. उदा. १९८४-८५ मध्ये एकूण निधीमध्ये शिक्षण व वैद्यकीय निधीचे शेकडा प्रमाण ०.७९ टक्के आहे तर १९९०-९१ मध्ये ०.५३ टक्के आहे.

संस्थेला आपली दैनंदिन कामे व व्यवहार पार पाडत असताना धोका स्विकारावा लागतो. समजा काही कारणामुळे संस्थेला धोका निर्माण झाला आणि त्यामुळे संस्थेची विश्वास अर्हतता धोक्यात येत असेल तर अशावेळी संस्थेची विश्वास अर्हतता टिकून राहवी म्हणून संस्थेने रिस्क फंड निर्माण केलेला आहे. १९८०-८१ या वर्षीच्या रिस्क फंडाशी तुलना करता १९८१-८२ व १९८२-८३ मध्ये ८८.१७ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. परंतु १९८३-८४ म ते १९९०-९१ या आठ वर्षांमध्ये रिस्क फंडात काहीही वाढ झालेली नाही. रिस्क फंडाचे एकूण निधीशी असलेले शेकडा प्रमाण कमी आहे. तर त्यामध्ये १९८०-८१ ते १९९०-९१ या अकरा वर्षांमध्ये एकूण निधीशी जे शेकडा प्रमाण आहे त्यामध्ये चढउतार झालेला आहे. उदा. १९८०-८१ मध्ये एकूण निधी मध्ये रिस्क फंडाचे शेकडा प्रमाण ०.९१ टक्के आहे. तर १९८३-८४ मध्ये शेकडा प्रमाण २.५३ टक्के आहे. १९८८-८९ मध्ये शेकडा प्रमाण १.७० टक्के आहे तर १९९०-९१ मध्ये शेकडा प्रमाण १.४० टक्के आहे. (तक्ता क्र. ४.३)

१९८०-८१ ते १९९०-९१ या अकरा वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी संस्थेचा एकूण निधी वाढलेला आहे. १९८०-८१ च्या एकूण निधीशी तुलना करता १९९०-९१ मध्ये एकूण निधीमध्ये दुपटीने वाढ झालेली आहे.

२) संस्थेने उभारलेले कर्जाऊ वित्त :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने सभासदांच्याकडून स्वीकारलेल्या विविध प्रकारच्या ठेवी, आणि कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर शाखा श्री. शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर व इतर संस्थांकडून कर्जे घेऊन विविध साधनसामग्री जमा केलेली आहे. या वित्तावरती संस्थेला व्याज स्वरूपाने रक्कम खर्च करावी लागते. यासाठी या वित्तिय साधनसामग्रीचा संस्थेला अत्यंत योग्य व फायदेशीररीत्या वापर करावा लागतो. संस्थेची अशा वित्तावर संपूर्ण व कायमची मालकी नसते म्हणून या वित्तास उभारलेले कर्जाऊ वित्त असे म्हटले जाते. कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेकडे असणाऱ्या ठेवीमधील भांडवल आणि संस्थेने घेतलेली कर्जे याबाबतचे विश्लेषण पुढे केले आहे.

अ) संस्थेकडे असणाऱ्या ठेवी -

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने फक्त सभासदांकडूनच ठेवी जमा केलेल्या आहेत. बिगर सभासदांकडून संस्थेने ठेवी जमा केलेल्या नाहीत. या संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये ज्या ठेवी जमा केलेल्या आहेत त्या तक्ता क्र.४.४ मध्ये दर्शविल्या आहेत.

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेने फक्त तीनच प्रकारच्या ठेवी जमा केलेल्या आहेत.

१. सभासद ठेव.
२. सभासद कायम ठेव.
३. सभासद शेअर्स रेवजी ठेव.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने व्यापारी बँकाप्रमाणे सभासद बचत ठेव, सभासद मुदत ठेव, पोस्ट बचत ठेव, बिगर सभासद ठेव या ठेवी जमा केलेल्या नाहीत.

## तक्ता क्र. ४.४

## ठेवीचे वर्गीकरण

(आकडे रुपयात)


| वर्ष | सभासद ठेव | | सभासद कायम ठेव | | सभासद शेअर्स रिवजी ठेव | | एकूण ठेव | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रक्कम | टक्केवारी | रक्कम | टक्केवारी | रक्कम | टक्केवारी | रक्कम | टक्केवारी |
| १९८०-८१ | ४८९-५० | ३.२२ | ४,९८०-०० | ३२.७२ | ९,७५०-०० | ६४.०६ | १५,२१९-५० | १००.०० |
| १९८१-८२ | ४८९-५० | २.५९ | १,५५०-०० | ८.२० | १६,८६५-०० | ८९.२१ | १८,९०४-५० | १००.०० |
| १९८२-८३ | ४८९-५० | १.६७ | ४८३-०० | १.६४ | २८,४१५-०० | ९६.६९ | २९,३८७-५० | १००.०० |
| १९८३-८४ | ४८९-५० | १.३२ | २५३-०० | ०.६८ | ३६,३२०-०० | ९८.०० | ३७,०६२-५० | १००.०० |
| १९८४-८५ | ४७९-५० | १.०२ | १३८-०० | ०.२९ | ४६,२७०-०० | ९८.६९ | ४६,८८७-५० | १००.०० |
| १९८५-८६ | ४७९-५० | ०.८४ | १३८-०० | ०.२४ | ५६,३५०-०० | ९८.९२ | ५६,९६७-५० | १००.०० |
| १९८६-८७ | ४७९-५० | ०.६९ | १३८-०० | ०.२० | ६९,३४५-०० | ९९.११ | ६९,९६२-५० | १००.०० |
| १९८७-८८ | ४७९-५० | ०.६५ | १३८-०० | ०.१९ | ७३,००५-०० | ९९.१६ | ७३,६२२-५० | १००.०० |
| १९८८-८९ | ४७९-५० | ०.७१ | १३८-०० | ०.२० | ६७,१२५-०० | ९९.०९ | ६७,७४२-५० | १००.०० |
| १९८९-९० | ४७९-५० | ०.७४ | १३८-०० | ०.२१ | ६४,२१०-०० | ९९.०५ | ६४,८२७-५० | १००.०० |
| १९९०-९१ | ४७९-५० | ०.७९ | १३८-०० | ०.२३ | ६०,०८०-०० | ९८.९८ | ६०,६९७-५० | १००.०० |

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल

## आलेख क्र. ४.३

## " संस्थेची १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील एकूण ठेवींची स्थिती दर्शविणारा आलेख "

प्रमाण :-
१ सें.मी. = १०,००० रु. एकूण ठेव.




BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
KOLHAPUR

संस्थेने सभासदांकडून सभासद ठेव जमा केलेली आहे. अशी ठेव सभासद संस्थेमध्ये ठेवतात व आपल्या गरजेनुसार आपल्या खात्यामधील रक्कम काढू शकतात. १९८०-८१ मध्ये संस्थेकडे ४८९-५० इतकी सभासद ठेव आहे. तर १९९०-९१ मध्ये रु. ४७९-५० इतकी सभासद कायम ठेव आहे. (तक्ता क्र. ४.४) संस्थेच्या एकूण ठेवीमध्ये सभासद ठेवीचे प्रमाण फारच अल्प आहे. म्हणजेच १९८०-८१ मध्ये संस्थेकडे एकूण रु. १५,२१९-५० इतकी ठेव जमा आहे. त्यामध्ये सभासद ठेव फक्त रु. ४८९-५० आहे. म्हणजेच १९८०-८१ मध्ये संस्थेच्या एकूण ठेवीमध्ये सभासद ठेवीचे प्रमाण ३.२२ टक्के आहे. (तक्ता क्र. ४.४) तर १९९०-९१ मध्ये संस्थेच्या एकूण ठेवीमध्ये सभासद ठेवीचे प्रमाण फक्त ०.७९ टक्के आहे (तक्ता क्र. ४.४)

१९८०-८१ मधील संस्थेच्या सभासद ठेवीशी तुलना केल्यास १९८१-८२, १९८२-८३ व १९८३-८४ या वर्षी संस्थेच्या सभासद ठेवीमध्ये कसल्याही प्रकारची वाढ झालेली नाही. तर १९८४-८५ पासून १९९०-९१ पर्यन्त संस्थेच्या सभासद ठेवीमध्ये घट झालेली आहे व ती घट दरवर्षी २.०९ टक्क्यांनी झालेली आहे. कारण संस्थेने सभासदांच्या ठेवी जमा करण्याच्या बाबतीत उदासिनता दाखविली आहे.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेकडे काही सभासदांनी आपली रक्कम कायम ठेव म्हणून जमा केलेली आहे. संस्था त्यांना दरवर्षी व्याज अदा करते. १९८०-८१ मध्ये संस्थेकडे रु. ४,९८० सभासद कायम ठेव आहे. तर १९९०-९१ मध्ये १३८ रुपये कायम ठेव आहे. म्हणजेच १९८०-८१ मधील सभासद कायम ठेवीशी १९९०-९१ मधील ठेवीशी तुलना केल्यास सभासद कायम ठेवीमध्ये ९७.२३ टक्केनी घटले आहे. म्हणजेच सभासद कायम ठेवीमध्ये झालेल्या घटीचे शेकडा प्रमाण जास्त आहे. १९८०-८१ मधील सभासद कायम ठेवीशी तुलना केल्यास १९९०-९१ पर्यन्त दरवर्षी संस्थेच्या सभासद

कायम ठेवी मध्ये घटच झालेली आहे. उदा. १९८०-८१ मध्ये सभासद कायम ठेव रू. ४,९८० होती तर १९८१-८२ मध्ये रू. १,५५० आहे. तर १९९०-९१ मध्ये रू. १३८ आहे. (तक्ता क्र. ४.४) कारण १९८०-८१ नंतर संस्थेकडे सभासदांनी कायम ठेव ठेवलेली नाही तर सभासदांना त्यांची ठेव परत करण्यात आलेली आहे.

१९८०-८१ मध्ये संस्थेच्या एकूण ठेवीमध्ये सभासद कायम ठेवीचे प्रमाण जास्त आहे. (३२.७२ टक्के) १९८१-८२ पासून १९९०-९१ पर्यन्त सभासद ठेवीचे एकूण ठेवीमध्ये असलेले शेकडा प्रमाण फारच कमी आहे. उदा. १९८२-८३ मध्ये एकूण ठेवीमध्ये सभासद कायम ठेवीचे प्रमाण १.६४ टक्के तर १९८६-८७ मध्ये ०.२० टक्के तर १९९०-९१ मध्ये ०.२३ टक्के आहे. (तक्ता क्र. ४.४)

या संस्थेकडे सभासदांकडून सभासद शेअर्स खजी ठेव जमा केलेली आहे. ज्यावेळी संस्था सभासदांना अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज देते त्यावेळी प्रत्येक सभासदांकडून शेकडा ५ टक्के दराने शेअर्स खजी ठेव म्हणून घेते. संस्थेच्या उपविधीतील तरतुदीनुसार ज्या सभासदांच्या नावे रू. १०,००० पेक्षा जास्त भाग भांडवल जमा झालेले असेल अशा सभासदांकडूनच ५ टक्के दराने शेअर्स खजी ठेव घेतली जाते. १९८०-८१ मध्ये सभासद शेअर्स खजी ठेव रू. ९,७५० आहे तर १९९०-९१ मध्ये ती रू. ६०,०८० आहे. म्हणजेच, १९८०-८१ च्या सभासद शेअर्स खजी ठेवीची १९९०-९१ मधील सभासद शेअर्स खजी ठेवीशी तुलना केल्यास ६ पटीने वाढ झालेली आहे.(तक्ता क्र. ४.४) १९८९-९० व १९९०-९१ ही दोन वर्षे वगळता प्रत्येक वर्षी संस्थेच्या सभासद शेअर्स खजी ठेवी मध्ये वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ४.४)

संस्थेच्या एकूण व ठेवीमध्ये सभासद शेअर्स खजी ठेवीचे प्रमाण सर्वात जास्त आहे. उदा. १९८०-८१ मध्ये एकूण ठेवीमध्ये सभासद शेअर्स खजी ठेवीचे प्रमाण ६४.०६ टक्के आहे. तर १९८४-८५ मध्ये हेच प्रमाण

९८.६९ टक्के आहे.तर १९८९-९० मध्ये ९९.०५ टक्के आहे. (तक्ता क्र.४.४) १९८२-८३ ते १९९०-९१ पर्यन्त संस्थेच्या एकूण ठेवीमध्ये सभासद शेअर्स खेजी ठेवीचे प्रमाण ९६.०० टक्के पासून ९९.०० टक्के पर्यन्त आहे.

संस्थेच्या एकूण ठेवीमध्ये सभासद ठेव, सभासद कायम ठेव व सभासद शेअर्स खेजी ठेवी या तीन प्रकारच्या ठेवींचा समावेश आहे. १९८०-८१ मध्ये संस्थेकडे रु. १५,२१९-५० एवढी एकूण ठेव होती. १९९०-९१ मध्ये रु. ६०,६९७-५० एवढी ठेव आहे. म्हणजेच १९८०-८१ मधील संस्थेच्या एकूण ठेवीशी १९९०-९१ मधील ठेवीची तुलना केल्यास १९९०-९१ च्या एकूण ठेवीमध्ये ४ पटीने वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ४.४) १९८०-८१ पासून १९८८-८९ पर्यन्त संस्थेच्या एकूण ठेवीमध्ये वाढ झालेली आहे. तर १९८९-९० मध्ये व १९९०-९१ मध्ये संस्थेच्या एकूण ठेवीमध्ये घट झालेली आहे (तक्ता क्र.४.४)

थोडक्यात संस्थेच्या एकूण ठेवी मध्ये सभासद ठेव, सभासद कायम ठेवीचे प्रमाण फारच कमी आहे. तर सभासद शेअर्स खेजी ठेवीचे प्रमाण जास्त आहे. कारण सभासद शेअर्स खेजी ठेवीचे प्रमाण संस्थेच्या कर्ज पुरवठयावर अवलंबून असते. संस्थेने केलेल्या कर्जपुरवठयात वाढ होत असल्यामुळे सभासद शेअर्स खेजी ठेवीचे शेकडा प्रमाण जास्त आहे.

### २) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व इतर संस्थाकडील कर्जे :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था ही कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर शाखा श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर या बँकेकडून कर्ज घेते.सभासदांना आवश्यक असणारी पीक कर्जे, ऊस कर्जे, गोबर-गॅस प्लॅन्ट,ट्रॅक्टर, इलेक्ट्रीक मोटार इत्यादी प्रकारची अल्प व मध्यम मुदतीची कर्जे संस्था घेते आणि सभासदांना त्यांचा पुरवठा करते. याशिवाय संस्थेने कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून ठेव तारण कर्ज, गरज भासल्यास नजर गहाण कर्ज, कॅश क्रेडीट कर्ज घेतलेले आहे.

तक्ता क्र. ४.५

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या खेळत्या भांडवलाची रचना

(आकडे रुपयात)

| खेळत्या भांडवलाचे घटक | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ | १९८६-८७ | १९८७-८८ | १९८८-८९ | १९८९-९० | १९९०-९१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) भाग भांडवल | २१९५००-०० (३०.९८) | २६४६००-०० (३२.६६) | ३०७६७५-०० (२९.४७) | ३४२१००-०० (३४.०७) | ३७९०७०-०० (३७.२२) | ४११६४०-०० (३९.३५) | ४३०३८५-०० (४०.२५) | ४५०६१०-०० (४२.५७) | ४८३३९०-०० (३८.७९) | ५१६७००-०० (४१.६१) | ५५४३६०-०० (४१.३३) |
| २) राखीव निधी | ६५३८९-४० (९.२३) | ७०२०९-२३ (८.६७) | ७९७३०-८८ (७.६४) | ८७९२२-९० (८.७३) | ९८८१२-१६ (९.७८) | ११३३८१-६८ १२८१४५-८२ (१०.८३) | (११.९९) | १४४६७५-४८ (१३.६७) | १५६१४६-७२ (१२.६०) | १६८८२२-२१ (१३.५९) | १८३३३६-९२ (१३.६७) |
| ३) बुडीत कर्ज निधी व इतर निधी | ३८०९३-३६ (५.३८) | ३०३५४-५७ (४.९९) | ४५३१५-५५ (४.३४) | ५०२०३-६८ (४.९९) | ५४८६२-३४ (५.३९) | ६०३९६-७९ (५.७७) | ६१५९०-३९ (५.७६) | ६२८०८-२९ (५.९३) | ६५३३९-६६ (५.२४) | ६८१८३-६१ (५.४९) | ७००७३४-३१ (५.२७) |
| ४) ठेवी | १५२१९-५० (२.१५) | १८९०४-५० (२.३३) | २९३८७-५० (२.८२) | ३७०६२-५० (३.६८) | ४६८८७-५० (४.६०) | ५६९६७-५० (५.४४) | ६९९६२-५० (६.५४) | ७३६२२-५० (६.९६) | ६७७४२-५० (५.४४) | ६४८२७-५० (५.२२) | ६०६९७-५० (४.५३) |
| ५) कर्ज उभारणी | ३३४६१५-९५ (४७.२३) | ३५४५८५-९२ (४३.७७) | ५१६६४१-२८ (४९.४९) | ४१८८९०-२५ (४१.६२) | ३५९१०५-३५ (३५.२६) | २७३७३१-१० (२६.१४) | २८३९०५-३५ (२६.५५) | २२३६७३-४५ (२१.१३) | ३८२१८८-७५ (३०.६७) | ३०९१०९-९५ (२४.९६) | ३१३०७४-०० (२३.४०) |
| ६) इतर ऋण | ३५५९४-५० (५.०३) | ६१४४४-४५ (७.५८) | ६५१२७-०७ (६.२४) | ६१५७३-२० (६.११) | ७९६७७-४० (७.७५) | १३१०७४-५३ (१२.५१) | ९५१११-६८ (८.९१) | १०३११६-६५ (९.७४) | ९०४२५-०५ (७.२६) | ११३३६१-९५ (९.१३) | १५८३३५-७८ (११.८०) |
| ७) एकूण (१ ते ६) | ७०८४१२-७१ (१००.००) | ८१०१९८-६७ (१००.००) | १०४३८७७-२८ (१००.००) | १००६५५२-५३ (१००.००) | १०१८४१४-७५ (१००.००) | १०४७९११-६० (१००.००) | १०६९१८०-७४ (१००.००) | १०५८५०६-३७ (१००.००) | १२४६०३२-६८ (१००.००) | १२४१८०५-२२ (१००.००) | १३४१३३८-५१ (१००.००) |

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल


(टीप : कंसातील आकडे एकूण खेळत्या भांडवलाशी संबंधित प्रत्येक घटकाचे शेकडा प्रमाण दर्शवितात)

## आलेख क्र. ४.४

## "संस्थेचे १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील खेळते भांडवल दर्शविणारा आलेख"

प्रमाण :-

१ सें.मी. = १,००००० रु. खेळते भांडवल.



क्र. ३.५). १९८०-८१ च्या खेळत्या भांडवलाशी तुलना करता १९९०-९१ पर्यन्त प्रत्येक वर्षी खेळते भांडवल वाढलेले आहे.

१९८०-८१ ते १९८३-८४ पर्यन्त संस्थेच्या एकूण खेळत्या भांडवलामध्ये बँक कर्जाचे प्रमाण जास्त आहे म्हणजेच १९८०-८१ मध्ये बँक कर्जाचे एकूण खेळत्या भांडवलामध्ये प्रमाण ४७.२३ टक्के आहे. तर १९८१-८२ मध्ये ४३.७७ टक्के आहे. १९८३-८४ मध्ये ४१.६२ टक्के आहे. (तक्ता क्र.४.५) तर १९८४-८५ ते १९९०-९१ पर्यन्त एकूण खेळत्या भांडवलामध्ये भाग भांडवलाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. म्हणजेच १९८४-८५ मध्ये भाग भांडवलाचे एकूण खेळत्या भांडवलामध्ये प्रमाण ३७.२२ टक्के आहे तर १९८५-८६ मध्ये ३९.३१ टक्के आहे. १९८६-८७ मध्ये ४०.२५ टक्के आहे तर १९९०-९१ मध्ये ४१.३३ टक्के आहे. (तक्ता क्र. ४.५) १९८४-८५ ते १९९०-९१ या काळामध्ये भाग भांडवलाचे संस्थेच्या एकूण खेळत्या भांडवलामध्ये प्रमाण सर्वात जास्त असल्यामुळे भाग भांडवलास महत्व प्राप्त झालेले आहे.

१९८०-८१ ते १९९०-९१ या ११ वर्षांच्या काळामध्ये १९८२-८३ व १९८८-८९ ही दोन वर्षे वगळता संस्थेच्या एकूण खेळत्या भांडवलातील भाग भांडवलाचे प्रमाण वाढत गेलेले आहे. (तक्ता क्र. ४.५). एकूण खेळत्या भांडवलातील भाग भांडवलाचे प्रमाण वाढत जाणे व संस्थेने घेतलेल्या कर्जाच्या प्रमाणात घट होणे हे संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने फायदेशीर आहे.

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या खेळत्या भांडवलातील राखीव निधीचे शेकडा प्रमाण कमी असून त्यामध्ये चढउतार झालेला आहे. म्हणजेच काही वर्षी एकूण खेळत्या भांडवलातील राखीव निधीचे प्रमाण वाढलेले आहे तर काही वर्षी खेळत्या भांडवलातील राखीव निधीचे प्रमाण घटलेले आहे. उदा. १९८०-८१ मध्ये एकूण खेळत्या भांडवलामध्ये राखीव निधीचे प्रमाण ९.२३ टक्के आहे तर १९८१-८२ मध्ये ८.६७ टक्के

आहे तर १९८२-८३ मध्ये ७.६४ टक्के आहे तर १९८३-८४ मध्ये ८.७३ टक्के आहे. १९९०-९१ मध्ये १३.६७ टक्के आहे. (तक्ता क्र. ४.५)

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये केलेल्या भांडवलामध्ये ठेवींचे प्रमाण सर्वात कमी आहे. उदा. १९८०-८१ मध्ये एकूण केलेल्या भांडवलामध्ये ठेवींचे प्रमाण २.१५ टक्के आहे तर १९८४-८५ मध्ये ४.६० टक्के आहे. तर १९९०-९१ मध्ये ४.५३ टक्के आहे (तक्ता क्र. ४.५) परंतु १९८०-८१ ते १९८७-८८ पर्यन्त प्रत्येक वर्षी एकूण केलेल्या भांडवलातील ठेवींचे प्रमाण वाढत गेलेले आहे. १९८८-८९ ते १९८९-९० मध्ये हेच प्रमाण घटलेले आहे तर १९९०-९१ मध्ये परत एकूण केलेल्या भांडवलातील ठेवींचे प्रमाण वाढलेले आहे. (तक्ता क्र. ४.५)

तक्ता क्र.४.६ मध्ये संस्थेचे सरासरी सभासद मालकीचे निधी व सरासरी सभासद केलेले भांडवल दर्शविले आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये १९८४-८५ हे वर्ष वगळता प्रत्येक वर्षी सरासरी सभासद मालकीच्या निधीमध्ये वाढ झालेली आहे. तर सरासरी सभासद केलेले भांडवलामध्ये चढउतार झालेला आहे. १९८०-८१ मध्ये सरासरी सभासदांचे केलेले भांडवलाशी सरासरी सभासदांच्या मालकीच्या निधीचे प्रमाण १४.६१ टक्के आहे तर १९९०-९१ मध्ये हेच प्रमाण १८.९४ टक्के आहे. (तक्ता क्र.४.६)

तक्ता क्र. ४.६

प्रति सभासद निधी व खेळते भांडवल

| वर्ष | प्रति सभासद निधी (रूपये) | प्रति सभासद खेळते भांडवल (रूपये) | कॉलम नं.२ चे कॉलम नं. ३ शी शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- | --- |
| १. | २. | ३. | ४. |
| १९८०-८१ | १८७-४७ | १,२८३-३६ | १४.६१ |
| १९८१-८२ | १९६-२१ | १,४३६-५२ | १३.६६ |
| १९८२-८३ | २०९-८१ | १,७५१-४७ | ११.९९ |
| १९८३-८४ | २२४-९६ | १,६३९-३४ | १३.७२ |
| १९८४-८५ | २२१-४३ | १,४६७-४६ | १५.०९ |
| १९८५-८६ | २४७-९० | १,४९३-८५ | १६.५९ |
| १९८६-८७ | २६५-३७ | १,४९५-३६ | १७.७५ |
| १९८७-८८ | २९०-१९ | १,५१८-१९ | १९.११ |
| १९८८-८९ | ३०७-०२ | १,७२१-०५ | १७.८४ |
| १९८९-९० | ३२५-११ | १,७०३-४४ | १९.०९ |
| १९९०-९१ | ३३४-७४ | १,७६७-२४ | १८.९४ |

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल.

## विभाग दुसरा

### कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेचा कर्ज पुरवठा

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी ही संस्था सभासदांना अल्प मुदत कर्ज पुरवठ्याबरोबर मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा करते. सर्वसाधारणपणे वेगवेगळया हेतुनुसार आणि कार्यासाठी अल्प व मध्यम मुदती कर्जे ही संस्था सभासदांना पुरवित आहे.

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने प्रामुख्याने तीन प्रकारची कर्जे दिलेली आहेत.

१. अल्प मुदत कर्जे
२. मध्यम मुदत कर्जे
३. रूपांतरित कर्जे.

१) अल्प मुदत कर्जाचे वर्गीकरण :

अल्प मुदतीच्या कर्जाचा कालावधी १२ महिनेपर्यन्त असतो. काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये हा कालावधी १५ महिन्यांपर्यन्त आहे. कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि.,कदमवाडी या संस्थेने सभासदांना शेतीची दैनंदिन कामे पार पाडणे, शेतीसाठी आवश्यक असणारी आधुनिक खते, बी-बियाणे, जंतुनाशके, तृणनाशके खरेदी करणे, पिकांची विक्री करणे, औद्योगिक हेतूसाठी कारागीरांना अल्प मुदत कर्जे दिलेली आहेत.

तक्ता क्र. ४.७

अल्प मुदत कर्ज पुरवठयाची रचना - १९८०-८१ ते १९९०-९१)


| वर्ष | ऊस पीक कर्ज (सबल) (रू.) | ऊस पीक कर्ज (दुर्बल) (रू.) | सावटी कर्ज (रू.) | गु-हाळ कर्ज (रू.) | एकूण (रू.) | निर्देशांक | गतवर्षाशी तुलना करता होणारा शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | २,०३,९५२-०० | २,३७,६१०-६५ | १२,०५६-०८ | - | ४,५३,६१८-७३ | १००.०० | ... |
| १९८१-८२ | १,९७,४१४-४० | ३,५१,२३५-३५ | १३,३७६-०८ | - | ५,६२,०२५-८३ | १२३.८९ | २३.८९ |
| १९८२-८३ | १,६६,१३२-४० | ४,३१,६९५-५५ | १४,३६४-५० | - | ६,१२,१९२-४५ | १३४.९५ | ८.९२ |
| १९८३-८४ | १,०४,५४२-१५ | ४,५२,३४८-६३ | १७,००३-१० | ३,३१०-०० | ५,७७,२०३.८८ | १२७-२४ | -५.७१ |
| १९८४-८५ | १,११,९४१-१५ | ४,८५,१८१-२२ | २६,७३९-८० | ४,३६८-८८ | ६,२८,२३९-०५ | १३८.४१ | ८.८४ |
| १९८५-८६ | ३३,५००,०० | ४,७८,५१२-०० | ११,०००-०० | ७४,१२०-०० | ५,९७,२१२-०० | १३१.६५ | -४.९० |
| १९८६-८७ | १,३९,२५४-५१ | ४,४२,८०-९४ | २६,६५४-३० | ३,५००-८८ | ६,१२,२३०-७१ | १३४.९६ | २.५१ |
| १९८७-८८ | १,३०,५६१-५१ | ४,६५,२७४-८५ | २४,४९५-४५ | ३,०३०-१८ | ६,२३,३५०-०७ | १३७.४२ | १.८० |
| १९८८-८९ | १,५०,४१२-५१ | ५,११,१४८-०५ | २७,९७२-८० | ३,०३०-१८ | ७,८०,५६३-६२ | १७२.०७ | २५.२० |
| १९८९-९० | १,३३,८०१-५१ | ६,७१,०१०-३१ | २३,३४४-८० | ३,०३०-१८ | ८,३९,१८६-९६ | १८४.९१ | ७.५० |
| १९९०-९१ | १,४१,४४७-५१ | ६,२३,८७९-३४ | ३१,९५१-८० | ३,०३०-१८ | ८,००,३०८-९१ | १७६.४२ | -४.६३ |
| एकूण : | १५,१२,९७६-०५ | ५२,४६,७१६-९७ | २,२८,९५८-७१ | ९७,४२०-४८ | ७०,८६,१५२-२१ | - | - |
| एकूण अल्प मुदत कर्जाशी शेकडा प्रमाण | २१.३६ | ७४.०४ | ३.२३ | १.३७ | १००.०० | | |

आधार : संस्थेचे वार्षिक अहवाल.

## विभाजीत वर्तुळ क्र. ४.१

## संस्थेच्या अल्पमुदत कर्जपुरवठ्याची रचना

(१९८०-८१ ते १९९०-९१)



**सूची:-**

- ▦ → ऊस पीक कर्ज (सबल)
- ▥ → ऊस पीक कर्ज (दुर्बल)
- □ → खावटी कर्ज
- ■ → गुन्हार कर्ज

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि. कदमवाडी या संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ काळामध्ये दिलेली अल्पमुदतीची कर्जे तक्ता क्र. ४.७ मध्ये दर्शविली आहेत.

या संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये सभासदांना चार प्रकारची अल्पमुदत कर्जे दिलेली आहेत.

१. ऊस पीक कर्ज (सबल घटक)

२. ऊस पीक कर्ज (दुर्बल घटक)

३. खावटी कर्ज

४. गुऱ्हाळ कर्ज

१) <u>ऊस पीक कर्ज (सबल घटक)</u>-

ज्या सभासद शेतकऱ्यांच्या मालकीची ५ एकरापेक्षा जास्त जमीन असेल त्या शेतकऱ्यांना सबल घटक असे म्हटले जाते. अशा शेतकऱ्यांना १९८०-८१ ते १९९०-९१ या ११ वर्षांच्या कालावधीमध्ये सबल शेतकऱ्यांना संस्थेने ऊस पीक कर्ज दिलेले आहे.

१९८०-८१ मध्ये संस्थेने ऊस पीक कर्ज (सबल घटक) रू. २,०३,९५२ दिलेले आहे. तर १९९०-९१ मध्ये सबल घटकांना ऊस पीक कर्ज रू. १,४१,४४७-५९ दिलेले आहे. म्हणजेच १९८०-८१ मध्ये सबल घटकांना दिलेल्या ऊस पीक कर्जाशी १९९०-९१ मध्ये दिलेल्या ऊस पीक कर्जाची (दुर्बल घटक) तुलना करता ३०.६५ टक्केनी घट झालेली आहे. १९८५-८६ मध्ये संस्थेने सबल घटक सभासदांना जे ऊस पीक कर्ज दिलेले आहे त्यामध्ये जास्त घट झालेली आहे. म्हणजेच १९८५-८६ मध्ये संस्थेने सबल घटक सभासदांना रू. ३३,५०० कर्ज दिलेले आहे. कारण त्यावर्षी संस्थेच्या सभासदांमध्ये थकबाकी सभासदांचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्यांनी संस्थेकडे कर्ज मागणी केलेली नाही. त्यामुळे १९८४-८५ यावर्षी सबळ घटकांना दिलेल्या कर्जात एकदम जास्त घट झालेली आहे. १९८०-८१ ते १९९०-९१

या ११ वर्षांमध्ये सबल घटक सभासदांना संस्थेने जे ऊस पीक कर्ज दिलेले आहे त्यामध्ये चढउतार झालेला आहे. म्हणजेच काही वर्षी या कर्जाच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तर काही वर्षी या कर्जामध्ये घट झालेली आहे. उदा. १९८०-८१ मध्ये ऊस पीक कर्ज (सबल घटक) रु. २,०३,९५२ दिलेले आहे तर १९८१-८२ मध्ये रु. १,९७,४१४-४० दिलेले आहे. १९८४-८५ मध्ये रु. १,११,९४९-१५ दिलेले आहे तर १९९०-९१ मध्ये रु. १,४१,४४७-५९ दिलेले आहे (तक्ता क्र. ४.७) कारण ज्या वर्षी थकबाकीदार सभासदांचे प्रमाण कमी आहे व कर्ज मागणी जास्त आहे त्यावर्षी ऊस पीक कर्ज (सबल घटक) यामध्ये वाढ झालेली आहे व ज्यावर्षी थकबाकीदार सभासदांचे प्रमाण जास्त आहे आणि सभासदांची कर्ज मागणी कमी आहे. त्यावर्षी कर्जाचे प्रमाण कमी झालेले आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या ११ वर्षांमध्ये संस्थेने सभासदांना ऊस पीक कर्ज (सबल घटक) रु. १५,१२,९५६-०५ दिलेले आहे. संस्थेने दिलेल्या एकूण अल्प मुदतीच्या कर्जामध्ये ऊस पीक कर्ज (सबल घटकाचे) प्रमाण २१.३६ टक्के आहे (तक्ता क्र. ४.७)

ऊस पीक कर्ज (दुर्बल घटक)

ज्या सभासद शेतकऱ्यांना ५ एकरापेक्षा कमी जमीन आहे त्यांना दुर्बल घटक असे म्हणतात. कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या अकरा वर्षांमध्ये सभासदांना ऊस पीक कर्ज (दुर्बल घटक) रु. ५२,४६,७९६-९७ दिलेले आहे. संस्थेने या काळामध्ये जे एकूण अल्प मुदत कर्ज दिलेले आहे त्यामध्ये ऊस पीक कर्ज (दुर्बल घटक) यांचे प्रमाण ७४.०४ टक्के आहे व हे प्रमाण सर्वांत जास्त आहे. म्हणजेच संस्थेने कर्ज देते वेळी जास्तीत जास्त कर्ज हे दुर्बल घटकातील सभासदांना दिलेले आहे. १९८०-८१ मध्ये ऊस पीक कर्ज (दुर्बल घटक) रु. २,३७,६१०-६५ दिलेले आहे. तर १९९०-९१ मध्ये १६२.५६ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. म्हणजेच २.६५ पटीने वाढ झालेली

आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये १९८९-९० आणि १९९०-९१ ही दोन वर्षे वगळता संस्थेने दिलेल्या ऊस पीक कर्ज (दुर्बल घटक) यामध्ये प्रत्येक वर्षी वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ४.७)

३) खावटी कर्ज :

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर या बँकेमार्फत आपले कर्ज विषयक धोरण जाहीर केले जाते. त्यामध्ये बँकेने खावटी कर्जाची संकल्पना मांडली आहे. संस्थेचे जे सभासद भूमिहीन शेतमजूर व कारागीर इत्यादींना त्यांचे गरजेनुसार खावटी कर्ज दिले जाते. खावटी कर्ज प्रत्येक सभासदाला जास्तीत जास्त रु.४००-०० पर्यन्तच मंजूर केले जाते. खावटी कर्ज घेणाऱ्या सभासदांने खावटी कर्ज घेतेवेळी स्वत:च्या मालकीची जिंदगी असणारे दोन लायक जामिनदार देणे गरजेचे आहे.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने आपल्या भूमीहीन, शेतमजूर व कारागीर सभासदांना त्यांच्या गरजेनुसार खावटी कर्ज दिलेले आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या अकरा वर्षांमध्ये संस्थेने एकूण रु. २,२८,९५८-७१ इतके खावटी कर्ज दिलेले आहे. संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या अकरा वर्षांमध्ये एकूण दिलेल्या अल्पमुदतीच्या कर्जामध्ये खावटी कर्जाचे प्रमाण ३.२३ टक्के आहे. (तक्ता क्र. ४.७) म्हणजेच एकूण अल्प मुदतीच्या कर्जामध्ये खावटी कर्जाचे शेकडा प्रमाण कमी आहे. १९८०-८१ मध्ये संस्थेने रु. १२,०५६-०८ इतके खावटी कर्ज दिले तर १९९०-९१ मध्ये रु.३१,९५१-८० इतके खावटी कर्ज दिलेले आहे. म्हणजेच १९८०-८१ मध्ये दिलेल्या खावटी कर्जाशी तुलना करता १९९०-९१ मध्ये दिलेल्या खावटी कर्जामध्ये १६५.०२ टक्केनी वाढ झालेली आहे. १९८०-८१ ते १९८४-८५ पर्यन्त खावटी कर्जामध्ये वाढ झालेली आहे. तर १९८५-८६ मध्ये खावटी कर्जात घट झालेली आहे. परत १९८६-८७ मध्ये खावटी कर्जात वाढ झालेली आहे तर १९८७-८८ मध्ये खावटी कर्जात घट झालेली आहे. परत १९८८-८९ मध्ये दिलेल्या खावटी कर्जामध्ये वाढ

झालेली आहे. तर १९८९-९० मध्ये घट झालेली आहे आणि परत १९९०-९१ मध्ये खावटी कर्जामध्ये वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ४.७) म्हणजे संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये जे खावटी कर्ज दिलेले आहे त्यामध्ये प्रत्येक वर्षी चढउतार झालेला आहे. कारण या प्रकारचे कर्ज देण्यावर संस्थेला मर्यादा आहेत आणि फक्त भूमिहीन, शेतमजूर व कारागीर सभासदांनाच ते दिले जाते. त्यामुळे ज्या वर्षी हे कर्ज प्राप्त करणारे लायक सभासद जास्त कर्ज मागणी करतात त्या वर्षी खावटी कर्जाचे प्रमाण वाढलेले आहे व मागणी कमी असेल त्या वर्षी प्रमाण घटलेले आहे.

४) गु-हाळ कर्ज :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेचे जे ऊस उत्पादक सभासद आहेत त्यापैकी काही सभासद आपला ऊस साखर कारखान्याला न देता गुळ तयार करण्यासाठी वापरतात. कारण कोल्हापूर गुळ उत्पादनाच्या बाबतीत प्रसिध्द आहे आणि कोल्हापूरमध्ये गुळाला चांगला दर मिळतो. त्यामुळे काही सभासद आपला ऊस गुळ तयार करण्यासाठी देतात. ऊसापासून गुळ तयार करण्यासाठी जो खर्च करावा लागतो त्यासाठी संस्था कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर यांच्या कर्ज धोरणानुसार सभासदांना गु-हाळ कर्ज देते. ही संस्था ज्या सभासदांची मागील सालच्या वसूल पात्र कर्जापैकी किमान ७५.०० टक्के वसुली माल विक्रीतून झालेली आहे. अशा सभासदास त्यांचे गु-हाळ क्षेत्रास एकरी रु.१००० व जास्तीत जास्त रु. ६००० पर्यन्त गु-हाळ कर्ज मंजूर करते. गु-हाळ कर्ज हे अल्प मुदत कर्ज असून थकबाकीदार सभासदांना संस्था गु-हाळ कर्ज देत नाही. १९८३-८४ मध्ये संस्थेने रु. ३,३९० गु-हाळ कर्ज दिलेले आहे तर १९९०-९१ मध्ये रु. ३,०३०-१८ गु-हाळ कर्ज दिलेले आहे. म्हणजेच १९८३-८४ मध्ये संस्थेने जे गु-हाळ कर्ज दिलेले आहे त्याच्याशी १९९०-९१ मध्ये दिलेल्या गु-हाळ कर्जाची तुलना केल्यास ८.४५ टक्क्यांनी घट झालेली आहे. १९८५-८६ मध्ये संस्थेने रु. ७४,१२०-०० गु-हाळ

कर्ज दिलेले आहे व ते सर्वात जास्त आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या वर्षांमध्ये संस्थेने दिलेल्या एकूण अल्प मुदत कर्जामध्ये गु-हाळ कर्जाचे प्रमाण १.३७ टक्के आहे. म्हणजेच एकूण अल्प मुदत कर्जामध्ये गु-हाळ कर्जाचे शेकडा प्रमाण कमी आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या अकरा वर्षांमध्ये संस्थेने रु. ९७,४२०-४८ इतके गु-हाळ कर्ज दिलेले आहे. (तक्ता क्र. ४.७).

१९८०-८१ व १९८१-८२ मध्ये संस्थेने गु-हाळ कर्ज दिलेले नाही. १९८३-८४ ते १९८५-८६ पर्यन्त दरवर्षी संस्थेने दिलेले गु-हाळ कर्ज वाढले आहे. तर १९८६-८७ मध्ये कमी झाले आहे. १९८७-८८ ते १९९०-९१ या चार वर्षी संस्थेच्या गु-हाळ कर्जात वाढ झालेली नाही.

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या अकरा वर्षात रु. ७०,८६,१५२-२१ इतके अल्प मुदतीचे कर्ज दिलेले आहे. १९८०-८१ मध्ये संस्थेने एकूण रु, ४,५३,६१८-७३ इतके अल्प मुदतीचे कर्ज दिलेले आहे तर १९९०-९१ मध्ये रु. ८,००,३०८-९१ इतके अल्प मुदतीचे कर्ज दिलेले आहे. म्हणजेच १९८०-८१ या वर्षी दिलेल्या अल्पमुदतीच्या कर्जाशी तुलना करता १९९०-९१ मध्ये दिलेल्या अल्प मुदतीच्या कर्जामध्ये ७६.४३ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये १९८३-८४, १९८५-८६ व १९९०-९१ हे वर्ष वगळता दिलेल्या अल्प मुदतीच्या कर्जात सातत्याने वाढ झालेली आहे. (तक्ता क्र. ४.७). १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील निर्देशांक वाढत गेलेला आहे.१९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेने दिलेल्या अल्प मुदतीच्या कर्जाच्या शेकडा प्रमाणामध्ये चढउतार झालेला आहे. म्हणजेच काही वर्षी अल्प मुदतीच्या कर्जाच्या शेकडा प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे.तर काही वर्षी घट झालेली आहे. उदा. १९८१-८२ मध्ये २३.८९ टक्केनी वाढ झालेली आहे तर १९८५-८६ मध्ये ४.९ टक्क्यांनी घट झालेली आहे तर १९८९-९० मध्ये ७.५ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. (तक्ता क्र.४.७)

२) मध्यम मुदतीचे कर्ज :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी ही संस्था सभासदांना मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा करते. मध्यम मुदतीच्या कर्जाचा कालावधी हा ५ वर्षांपर्यन्त आहे. संस्थेने प्रामुख्याने ट्रॅक्टर, विजेचा पंप, व इतर शेती अवजारे खरेदी करणे, लिफ्ट इरीगेशन, गोबर गॅस प्लॅंट इ. कारणासाठी मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा केलेला आहे.

संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या अकरा वर्षांमध्ये केलेल्या मध्यम मुदतीच्या कर्जाची रचना तक्ता क्र. ४.८ मध्ये दर्शविली आहे. संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या वर्षांमध्ये रू. ३,८८,७०९-९४ इतका मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा केलेला आहे. १९८२-८३ मध्ये संस्थेने रू. ९४,५०० इतका मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा केलेला आहे तर १९९०-९१ मध्ये रू. २३,४८१ इतका मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा केलेला आहे. म्हणजेच १९८२-८३ मध्ये जो मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा केलेला आहे त्याच्याशी तुलना करता १९९०-९१ मध्ये केलेल्या मध्यम मुदतीच्या कर्ज पुरवठ्यामध्ये ७५.१५ टक्क्यांनी घट झालेली आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ मध्ये दिलेल्या मध्यम मुदतीच्या कर्जाच्या प्रमाणात चढउतार झालेला आहे. म्हणजेच काही वर्षी मध्यम मुदतीचे कर्जात वाढ झालेली आहे. तर काही वर्षी घट झालेली आहे (तक्ता क्र. ४.८) १९८९-९० मध्ये संस्थेने दिलेल्या मध्यम मुदतीच्या कर्जात ३८५.०८ टक्क्यांनी वाढ झालेली आहे व ही वाढ सर्वात जास्त आहे, तर १९८८-८९ मध्ये संस्थेने दिलेल्या मध्यम मुदतीच्या कर्जात ७८.६६ टक्क्यांनी घट झालेली आहे व ही घट सर्वात जास्त आहे (तक्ता क्र. ४.८).

### तक्ता क्र. ४.८

### मध्यम मुदत कर्जांची रचना - १९८०-८१ ते १९९०-९१


| वर्ष | ट्रॅक्टर कर्ज (रू.) | इलेक्ट्रिक मोटार कर्ज (रू.) | गोबर गॅस प्लँट कर्ज (रू.) | सबमर्सिबल पंप कर्ज (रू.) | एकूण मध्यम मुदत कर्ज (रू.) | निर्देशांक | गतवर्षाशी तुलना करता होणारा शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | - | - | - | - | - | - | - |
| १९८१-८२ | - | - | - | - | - | - | - |
| १९८२-८३ | ९४,५००.०० | - | - | - | ९४,५००.०० | १००.०० | - |
| १९८३-८४ | ८६,५५८.०० | ९,२५०-०० | - | - | ९५,८०८.०० | १०१.३८ | १.३८ |
| १९८४-८५ | ६२,६४२.४६ | १०,३५०.०० | - | - | ७२,९९२.४६ | ७७.२४ | -२३.८० |
| १९८५-८६ | - | - | - | - | - | - | - |
| १९८६-८७ | ३७,०९९-१० | २,७९३.१४ | - | - | ३९,८९२.२४ | ४२.२१ | -४५.३४ |
| १९८७-८८ | २०,३९६.१० | ३२७.१४ | ६,८६९.०० | - | २७,५९२.२४ | २९.११ | -३०.८३ |
| १९८८-८९ | - | - | ५,८८७.०० | - | ५,८८७.०० | ६.२२ | -७८.६६ |
| १९८९-९० | - | - | ८,६५५.०० | १९,९०२.०० | २८,५५७.०० | ३०.२० | ३८५.०८ |
| १९९०-९१ | - | - | ७,१३७.०० | १६,३४४.०० | २३,४८१.०० | २४.८४ | -१७.७७ |
| एकूण : | ३,०१,१९५.६६ | २२,७२०.२८ | २८,५४८.०० | ३६,२४६.०० | ३,८८,७०९.९४ | - | - |
| शेकडा प्रमाण | ७७.४९ | ५.८५ | ७.३४ | ९.३२ | - | - | - |

संदर्भ : संस्थेचे छापील वार्षिक अहवाल.

## विभाजीत वर्तुळ क्र. ४.२

## संस्थेच्या मध्यम मुदत कर्जपुरवठ्याची रचना.

## (१९८०-८१ ते १९९०-९१)



१९८२-८३ मध्ये संस्थेने ट्रॅक्टर खरेदीसाठी रू.९४,५००, १९८३-८४ मध्ये रू. ८६,५५८, १९८४-८५ मध्ये रू. ६२,६४२.४६, १९८६-८७ मध्ये रू. ३७,७९९-१० तर १९८७-८८ मध्ये रू. २०,३९६.१० इतके मध्यम मुदत कर्ज दिलेले आहे. संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये संस्थेने ट्रॅक्टरसाठी एकूण रू. ३,०१,१९५-६६ इतके कर्ज दिलेले आहे. संस्थेच्या एकूण मध्यम मुदतीच्या कर्जामध्ये ट्रॅक्टर कर्जाचे प्रमाण ७७.४९ टक्के आहे (तक्ता क्र. ४.८) व हे प्रमाण इतर मध्यम मुदतीच्या कर्जापेक्षा जास्त आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ मधील काही वर्षी संस्थेने कर्ज दिलेले नाही कारण त्या वर्षी संस्थेकडे या कर्जाची मागणी नाही.

तसेच संस्थेने इलेक्ट्रिक मोटार खरेदीसाठी १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये रू. २२,७२०-२८ इतके मध्यम मुदतीचे कर्ज दिलेले आहे. एकूण मध्यम मुदतीच्या कर्ज पुरवठयामध्ये इलेक्ट्रिक मोटार कर्जाचे प्रमाण ५.८५ टक्के आहे व हे प्रमाण इतर मध्यम मुदतीच्या कर्जाशी तुलना करता कमी आहे. १९८७-८८ मध्ये संस्थेने इलेक्ट्रिक मोटार कर्ज सर्वात कमी म्हणजे रू. ३२७.१४ इतके दिलेले आहे. संस्थेने सभासदांना गोबर गॅस प्लॅन्ट खरेदीसाठी १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये रू. २८,५४८-०० इतके मध्यम मुदत कर्ज दिलेले आहे. संस्थेने दिलेल्या एकूण मध्यम मुदतीच्या कर्जामध्ये गोबर गॅससाठी दिलेल्या कर्जाचे प्रमाण ७.३४ टक्के आहे (तक्ता क्र. ४.८) त्याप्रमाणे संस्थेने १९८९-९० मध्ये रू. १९,९०२ व १९९०-९१ मध्ये रू. १६,३४४ असे एकूण रू. ३६,२४६ इतके कर्ज सबमर्शिबल पंपासाठी दिलेले आहे. संस्थेच्या एकूण मध्यम मुदतीच्या कर्ज पुरवठयामध्ये सबमर्शिबल पंपासाठी दिलेल्या कर्जाचे प्रमाण ९,३२ टक्के आहे.

३) रूपांतरित कर्ज :

संस्था काही वेळा अल्प मुदतीच्या कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जामध्ये रूपांतर करून देते. त्यास रूपांतरित कर्ज असे म्हणतात. शेती हा व्यवसाय निसर्गावर अवलंबून आहे. काही वेळा दुष्काळ, पूर, पावसाचे

कमी प्रमाण, भूकंप इत्यादी सारख्या नैसर्गिक आपत्ती आल्यामुळे शेती मधील पिकांचे नुकसान होते. अशा वेळी सभासद शेतकऱ्यांनी संस्थेकडून घेतलेली अल्प मुदत कर्जाची परतफेड वेळेत करणे अशक्य होते. अशावेळी संस्था अल्प मुदतीच्या कर्जाचे रूपांतर मध्यम मुदतीच्या कर्जामध्ये करून देते.

तक्ता क्र. ४.९

रूपांतरित कर्ज

| वर्ष | रूपांतरित कर्ज (रूपयात) |
|---|---|
| १९८०-८१ | - |
| १९८१-८२ | - |
| १९८२-८३ | - |
| १९८३-८४ | - |
| १९८४-८५ | १८,९५६.५० |
| १९८५-८६ | १३,१४०.७० |
| १९८६-८७ | - |
| १९८७-८८ | - |
| १९८८-८९ | - |
| १९८९-९० | - |
| १९९०-९१ | - |
| एकूण : | ३२,०९७.२० |

संदर्भ : संस्थेचे छापील वार्षिक अहवाल

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने १९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये दिलेले रूपांतरित कर्ज तक्ता क्र. ४.९ मध्ये दर्शविले आहे. १९८४-८५ मध्ये

संस्थेने रु. १८,९५६=५० इतके रुपांतरित कर्ज दिले आहे. तर १९८५-८६ मध्ये रु. १३,१४०-७० इतके रुपांतरित कर्ज दिलेले आहे. कारण यावर्षी पंचगंगा नदीला पूर आल्यामुळे शेतीपिकाचे नुकसान झाले होते. त्यामुळे सभासद शेतकरी संस्थेच्या अल्प मुदत कर्ज परत करू शकले नाहीत. म्हणून संस्थेने अल्प मुदत कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जामध्ये रुपांतर करून दिलेले आहे.

१९८०-९१ ते १९९०-९१ या काळात कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने केलेला एकूण कर्ज पुरवठा :

१९८०-९१ ते १९९०-९१ या काळामध्ये कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेने केलेला एकूण कर्ज पुरवठा तक्ता क्र. ४.१० मध्ये दर्शविला आहे.

१९८०-८१ ते १९९०-९१ या अकरा वर्षांमध्ये संस्थेने एकूण रु. ७५,०७,५६९-३५ इतका कर्ज पुरवठा केलेला आहे. एकूण कर्ज पुरवठयामध्ये अल्प मुदत कर्ज मध्यम मुदत कर्ज व रुपांतरित कर्ज इ. प्रकारच्या कर्जाचा समावेश आहे.

१९८०-८१ मध्ये संस्थेने एकूण रु. ४,५४,२२८-७३ इतका एकूण कर्ज पुरवठा केलेला आहे तर १९९०-९१ मध्ये रु. ८,२३,३७९-९१ इतका एकूण कर्ज पुरवठा केलेला आहे. म्हणजेच १९८०-८१ मध्ये संस्थेने केलेल्या एकूण कर्ज पुरवठयाशी तुलना करता १९९०-९१ मध्ये केलेल्या कर्ज पुरवठयाच्या प्रमाणात ८१.२६ टक्क्यांनी म्हणजेच १.८१ पटीने वाढ झालेली आहे. १९८१-८२ व १९८२-८३ मध्ये संस्थेने दिलेल्या कर्जात वाढ झालेली आहे. तर १९८३-८४ मध्ये संस्थेच्या एकूण कर्ज पुरवठयामध्ये घट झालेली आहे व ती घट १९८२-८३ च्या कर्ज पुरवठयाशी तुलना करता २.०८ टक्के आहे.

तक्ता क्रमांक ४.१०

संस्थेने केलेल्या एकूण कर्ज पुरवठा

| वर्ष | एकूण कर्ज (रुपयात) | निर्देशांक | गतवर्षाशी तुलना करता होणारा शेकडा बदल |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | ४,५४,२२८.७३ | १००.०० | - |
| १९८१-८२ | ५,६२,०२५.८३ | १२३.७३ | २३.७३ |
| १९८२-८३ | ७,०६,६९२.४५ | १५५.५८ | २५.७४ |
| १९८३-८४ | ६,९१,९६८.३८ | १५२.३३ | -२.०८ |
| १९८४-८५ | ७,१४,३७२.२१ | १५७.२७ | ३.२३ |
| १९८५-८६ | ५,९७,२१२.०० | १३१.४७ | -१६.४० |
| १९८६-८७ | ६,५२,१२२.९५ | १४३.५६ | ९.१९ |
| १९८७-८८ | ६,५०,९६२.३१ | १४३.३१ | -०.१७ |
| १९८८-८९ | ७,८६,४५०.६२ | १७३.१३ | २०.८१ |
| १९८९-९० | ८,६७,७४३.९६ | १९१.०३ | १०.३३ |
| १९९०-९१ | ८,२३,३७९.९१ | १८१.३६ | -५.०६ |
| एकूण : | ७५,०७,५६९.३५ | | |

संदर्भ : संस्थेचे छापील वार्षिक अहवाल.

(तक्ता क्र. ४.१०) परंतु परत १९८४-८५ मध्ये एकूण कर्ज पुरवठयामध्ये ३.२३ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. तर १९८५-८६ मध्ये एकूण कर्ज पुरवठयामध्ये १६.४० टक्क्यांनी घट झालेली आहे. व ही घट सर्वात जास्त आहे परत १९८६-८७ मध्ये एकूण कर्ज पुरवठयामध्ये ९.१९ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. तर १९८७-८८ मध्ये परत एकूण कर्ज पुरवठयामध्ये ०.१७ टक्क्यांनी घट झालेली आहे. १९८८-८९ मध्ये एकूण कर्ज पुरवठयात

२०.८१ टक्क्यांनी वाढ झालेली आहे तर १९८९-९० मध्ये १०.३३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तर १९९०-९१ मध्ये संस्थेच्या एकूण कर्ज पुरवठयात ५.०६ टक्क्यांनी घट झाली आहे (तक्ता क्र. ४.१०).

थोडक्यात १९८०-८१ ते १९९०-९१ या अकरा वर्षामध्ये संस्थेने जो एकूण कर्ज पुरवठा केलेला आहे त्यामधील प्रत्येक वर्षाच्या शेकडा प्रमाणामध्ये चढउतार आहे. म्हणजेच काही वर्षी एकूण कर्ज पुरवठयाचे शेकडा प्रमाण वाढलेले आहे. तर काही वर्षी एकूण कर्ज पुरवठयाच्या शेकडा प्रमाणामध्ये घट झालेली आहे. कारण ज्यावर्षी सभासदांची कर्ज मागणी जास्त आहे व थकबाकीचे प्रमाण कमी आहे. त्यावर्षी एकूण कर्ज पुरवठयाचे शेकडा प्रमाण वाढलेले आहे व ज्यावर्षी संस्थेकडे सभासदांची कर्ज मागणी कमी आहे व थकबाकीचे प्रमाण जास्त आहे. त्यावर्षी एकूण कर्जाच्या शेकडा प्रमाणामध्ये घट झालेली आहे.